# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६

दूरध्वनी ५६५६२३४ फॅक्स ५६५६२३४ E-mail : ropune.dte.@gmail.com.


---

**अतितात्काळ**
**न्यायालयीन प्रकरण**

जा क्र विकापु/आस्था३(ब)/आंदोलन/२०११/६१०
दिनांक ३/२/२०१२

प्रति,

प्राचार्य,
अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी
शासकीय तंत्रनिकेतन, पुणे / कराड / कोल्हापूर / सोलापूर / मिरज /

**विषय - मूळ अर्ज क्रमांक : १४०/२०१२**
**श्री पी एम डिमेलो व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर**

संदर्भ - मा संचालक तंत्रशिक्षण म रा मुंबई यांचे पत्र क्र १६/आस्था/न्याप्र/२०१२/१३ दिनांक २/२/२०१२

उपरोक्त सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यांत येते की, मुळ अर्जाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये अभिप्राय सादर करण्यांसाठी खालील मुद्दयांबाबतची आपल्या संस्थेतील माहिती या कार्यालयास **आजच** सादर करावी.

१) आपल्या संस्थेतील कर्मशाळेत व प्रयोगशाळेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या.
२) संचालनालयामार्फत दिनांक १४/१०/२०११ च्या परिपत्रकान्वये कर्तव्ये व जबाबदाऱ्या निर्धारीत केल्यानंतर त्यानुसार कामकाज न पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या.
३) संचालनालयामार्फत दिनांक १४/१०/२०११ च्या परिपत्रकान्वये कर्तव्ये व जबाबदाऱ्या निर्धारीत केल्यानंतर त्यानुसार कामकाज न पार पाडणाऱ्या किती कर्मचाऱ्यांचें वेतन रोखण्यांत आले आहे ?
४) ज्या कर्मचाऱ्यांचे वेतन रोखण्यांत आले, त्यापैकी किती कर्मचारी नियमित काम करण्यांस तयार झाल्यानंतर त्यांचे वेतन सरु करण्यांत आले ?
५) वेतन रोखण्यांत आलेला कालावधी.
६) कर्मचाऱ्यांच्या काम न करण्यांमुळे संस्थेंच्या कामकाजावर विपरीत परिणाम झाला असल्यास त्यासाठी केलेल्या उपाययोजना.

सदर माहिती या कार्यालयाच्या ई मेल ॲड्रेसवर तसेच टपालाव्दारे पाठविण्यांत यावी. सदरच्या माहितीवर आधारीत अभिप्राय प्रशासकीय न्यायधिकरणात सादर करण्यांसाठी आवश्यक असल्याने माहिती प्रथम प्राधान्याने सादर करावी.

(डी. एन. शिंगाडे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत - या कार्यालयातील श्री एस बी शिंदे, प्रोग्रॅमर, संगणक विभाग यांना माहितीसाठी.
त्यांना कळविण्यांत येते की, सदर माहिती तातडीची असल्याने, संकेत स्थळावर प्रदर्शित करावी.

Est3general 1-b-2910//294